म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ९३८२
१८५५

# भारावून

दत्ता कदम

REFBK-0008713
REFBK-0008713

# मान्सून

दत्ता कदम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलपत.
अनुक्रम 22608 कि 1/50
क्रमांक 9382 नों. 20/8
REFBK-0008713
REFBK-0008713
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6093

किंमत १॥ रुपया

इंदिरा प्रकाशन : : राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई ४

मुद्रक : ज. दि. देसाई, राष्ट्रवैभव प्रेस, वि. प. रोड, गिरगांव, मुंबई ४
प्रकाशक : ज. दि. देसाई, इंदिरा प्रकाशन, वि. प. रोड, गिरगांव मुंबई ४

# प्रस्तावना

नव्या काव्याचा मनःपूर्वक आस्वाद घेऊन त्यावर मार्मिक टीका लिहिणाऱ्यांतहि, 'मला सर्व नवें काव्य समजतें' असें म्हणणारा एकहि प्रामाणिक माणूस मला अजून भेटलेला नाही. इंग्रजी किंवा मराठी सर्व नवें काव्य मला समजतें असें म्हणण्याचें धाडस मी तर कधींच करणार नाहीं. अमक्या कवितेंत अमकें आहे असें आपण म्हणावें तों 'माझ्या मनांत तसं मुळींच नव्हतं' असें ती कविता करणारा कवीच सांगतो! किंबहुना नव्या काव्याच्या अनेक सामर्थ्यांपैकीं हें एक त्याचें सामर्थ्य आहे,-त्यांत अर्थांत अर्थ, अर्थांवर अर्थ, अर्थांखालीं अर्थ असतात. मनाच्या अनेक पातळ्यांवर एकाच वेळीं येणारे अनुभव कवि एकाच वेळीं देण्याचा प्रयत्न करीत असतो. त्या सर्वांची स्वतः कवीलाहि संपूर्ण जाणीव असते असें नाहीं. तेव्हां रसिकाची जाणीव कमी पडल्यास आश्चर्य नाहीं. नव्या कवितेच्या या वैशिष्ट्यामुळें एकाच कवितेंत अनेकांना अनेक वेगवेगळ्या गोष्टी सांपडतात,-कवीलाहि ज्यांची कल्पना नव्हती अशाहि गोष्टी सांपडतात. यामुळें नव्या कवड्यांचीं मात्र चांगली सोय झाली आहे. कांहींतरी खरडून 'उडाला तर कावळा, बुडाला तर बेडुक' असें निःशंकपणें त्यांना म्हणतां येते. कवीपासुन हे कवडे वेगळे काढण्याची जादा जबाबदारी आजच्या वाचकांवर येऊन पडली आहे.

'कौशल्य मोठें रचनेंत आहे' असें नवें काव्य मानीत नाहीं,-बहिरंगापेक्षां अंतरंगाला तें महत्व देतें ही चांगलीच गोष्ट आहे. चांगलें जुनें काव्यहि हेंच करीत होते. शाब्दिक कसरती, ज्ञान, बोध, प्रचार इत्यादिकांचा मोह टाळणें योग्य असलें तरी निर्भेळ काव्य देण्याच्या धडपडीत अर्थालाहि फांटा देणें कितपत शक्य आहे किंवा योग्य आहे हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. काव्य अर्थाच्या पलीकडे किंवा अर्थाच्या आसपास असतें, अर्थपूर्ण मजकुरांत काव्य असतेंच असें नाहीं, हें सर्व खरें आहे. पण कवितेंतला अर्थ म्हणजे गाडीला जोडलेच्या गाढवाच्या नाकासमोर धरलेले गाजर, अर्थाचें गाजर मटकावण्याकरितां कवितेचा वाचक 'आ' करून कवितेजवळ येतो, आणि गाजर दूरच रहातें पण काव्य मात्र त्याच्या तोंडांत पडते,-हें इंग्रजी नवकाव्याचा कुलगुरु टी. एस्. इलियट् यानें केलेलें विधान तितकेंसें खरें

नाहीं. काव्य म्हणुन जें कांहीं आहे तें अर्थाहून वेगळें असतें हें या विधानांतलें मत मला संपूर्णपणें मान्य आहे; पण गाढवाच्या नाकासमोर धूर्त गाडीवानानें टांगलेले गाजर आणि गाढवाकडुन गाडी ओढली जाणें यांचा जितका परस्पर संबंध आहे तितकाच कवितेंतला अर्थ आणि कवितेंतलें काव्य यांचा आहे हें मान्य करणें कठीण आहे. गाडी ओढायला नाखूष असलेलें गाढव गाजराच्या मोहानें पुढें पुढें जातें आणि त्याला नकळत त्याच्याकडुन गाडी ओढली जाते. त्याला फक्त गाजरच हवें असतें. कवितेचा वाचक तिच्यांतलें काव्य घ्यायला मुळींच नाखूष नसतो,–काव्यानंदाकरतांच तो कवितेकडे धांव घेतो. राजीखुषीनें गाडी ओढीत असलेल्या गाढवाच्या नाकासमोर गाजर बांधण्याची आवश्यकता गाडीवानाला मुळींच वाटत नाहीं. केवळ काव्याकरतां राजीखुषीनें कविता हातांत घेणाऱ्या वाचकाला इलियट् किंवा त्याचे भक्त अर्थाला अजिबात दूर ठेवून नुसतें काव्य देऊं शकतील काय? अर्थशून्य शब्द वापरून काव्य देण्याच्या प्रयत्नांत कदाचित् ते संगीत देऊं शकतील, पण काव्य देऊं शकतील काय? चांगल्या कवितेंत केवळ शब्दार्थाला कितीहि गौणत्व असलें तरी कवितेंतला अर्थ आणि काव्य यांचे संबंध, गाजर आणि गाडी ओढण्याची क्रिया यांच्यातल्यासारखें हवे तेव्हां वेगळे करतां येण्यासारखे खास नाहींत. फूल आणि गंध, शरीर आणि आत्मा यांच्यासारखे ते आहेत असेंच म्हणणें योग्य होईल. जुने कवि अनुभूतीचें निवेदन करतात; नवे अनुभूतीचें दर्शन देतात, असें कांहीं टीकाकार म्हणतात. पण या दोहोंत फारसा फरक आहे, असें मला वाटत नाहीं. अर्थ असलेले शब्द वापरले कीं तें निवेदन झालेंच, मग ते शब्द जुने कवि वापरोत कीं नवे कवि वापरोत. चित्रकार किंवा शिल्पकार किंवा संगीतकार जसें अनुभूतीचें इंद्रियगम्य दर्शन देतो, तसें जुना काय किंवा नवा काय, कवि कधींच देत नाहीं. अर्थ असलेला शब्द नेहमी निवेदनच करतो. असो.

श्री. दत्ता कदम या तरुण नवकवींनीं आपल्या कविता मला वाचायला दिल्या, आणि चार प्रास्ताविक शब्द लिहून द्या म्हणून सांगितलें. त्या निमित्तानें जे विचार सुचले ते सहज व्यक्त केले. हे विचार सुचायचें कारण इतकेंच कीं प्रस्तावना लिहायची म्हणजे सर्व कांहीं समजलें अशा थाटांत अधिकारयुक्त वाणीनें कांहींतरी सांगितलें पाहिजे. श्री. कदमांचेंच

काय पण कुणाचेंहि नवकाव्य सर्व कांहीं मला समजलें आहे असें म्हणण्याचें धाडस मी करूं शकत नाहीं. मात्र श्री. कदमांच्या ज्या कविता मला समजल्या किंवा समजल्यासारख्या वाटल्या त्या मला आवडल्या. त्यांच्यात चांगली काव्यशक्ति आहे याबद्दल माझी खात्री पटली. 'फूल असलें तर त्याला द्या......" या कवितेंतल्या कवींच्या अपार व्यथेनें मला व्यथित केलें. 'मनांत दडल्या लक्ष चांदण्या' या कवितेंतला 'पिवळा हात' कुसुमाग्रजांच्या 'स्वप्नाच्या समाप्ती'तील 'चांदण्याच्या हातां'जवळ ठेवावासा वाटला. 'या वाटेला वेड घराचें' ही सुंदर कविता वाचतांना केशवसुतांच्या 'गोष्टी घराकडिल त्या वदता गड्या रे' या कवितेची आठवण होते. आजची कविता कशी अधिक सघन आणि अधिक पैलूदार अनुभूति देऊं शकते तें इथें दिसतें. या कवितांत ठिकठिकाणीं एकप्रकारच्या दणकट जीवनाभिमुखतेचा अनुभव येतो. तो हृद्य आहे. 'जाण माझ्या मना आतां' या कवितेंत कवि म्हणतात,

'जाण माझ्या मना आतां
तुझ्या अस्तित्वाची खूण
जिथें मायेचें उधाण। तिथेंच ती...
............
............
मायेमुळें ब्रह्मांडाचें
मोल हृदयाला कळे
अहं ब्रह्मास्मिचें तळे । तुडुंबते...

'मदवणे' 'हृदयुन' 'अनंतणें' 'अमृतगोंदणे' असें अनेक रांगडे पण नवें शब्द श्री. कदमांनी घडवले आहेत. बऱ्याच ठिकाणीं रचनाहि ओबडधोबड आहे. पण त्यांचा हा निरोगी रांगडपणा दुबळ्या सफाईपेक्षां खूपच बरा वाटतो. अनावर शक्तिचेंच तो लक्षण आहे. इतकें पुरे.

अनंत काणेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 22208 वि: ८३।८८
क्रमांक ?३e२ नों: दि: ५।७।५५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6093

## कोनमाणूस

मी तर एक कोनमाणूस....

विश्वाच्या कोंपऱ्यांतुन
जगणारा जगवुन
चिरसौभाग्य.

मी तर एक कोनमाणूस...

लहानग्या खिशांत
जपणारा ज्योत
त्यासाठींच.

आंबव ४-५-५४

***

# मृगजळांत मी वल्हवित होतो...

मृगजळांत मी वल्हवित होतो
विलसत होते रंग बदलत्या चंद्राचें चांदणें,
लयींत होत्या उसळत
कमळांच्या ओठांवरच्या
दंवधर प्रणयविराण्या,
सुगंधीत झुलुकांचें नृत्य
कांहींच कुठें नव्हते मर्त्य,
धुंदावत होता अधिकच त्यांना
इंद्रधनूचा वाजपताल,
सोनेरी हंसांचा फेर
दृष्टीमध्यें त्यांच्या होता सुखासीनतेचाच अहेर,
तरि मी खिन्न....

परीपरी तूं येउन बसतां माझ्या होडीमधें
निरर्थकाला
अर्थ लाभला
तुझ्यामुळें ग तुझ्यामुळें....

आंग्रव १८-४-५४

***

## चांदोबा चांदोबा भागलास कां...

चांदोबा चांदोबा भागलास कां
म्हणतां म्हणतां
मनांत येते
मुंडक्याविना मुरारबाजी
लढतो आहे आज कुणास्तव
त्याच मुंडक्यावरती बसुनी
हंसतें आहे रद्दड वास्तव....

निंबोणीच्या झाडाआड लपलास कां
म्हणतां म्हणतां
मनांस डंसते
किरणोत्सर्गी केवळ ना जग
किरणोत्सर्गी आज भावना
किरणोत्सर्गी शुक्रबिंक्रही
सुटका नाहीं अतां याविना....

निंबोणीचें झाड करवंदी
म्हणतां म्हणतां
मनांत सलते
कप्प्यामधल्या कप्प्यामधले
काळोखाचें कल्प येथले
झाडित असतां कर पोलादी
निर्जिव बनती पुरे सांपळे
मामाचा वाडा चिरेबंदी
म्हणतां म्हणतां
मनांस छळते

जगावयाची वेडी आशा
माथे अपुले घेते फोडुन
तुकड्यांना त्या फुकट अखेरिस
तिचेंच भूतहि दमतें जोडुन....

मामाच्या वाड्यांत येऊन जा
म्हणतां म्हणतां
मनांत कढतें
थिटेपणाला हार यशाचें
जगवंती तर आज अर्पिते
मऱ्या रितींच्या उदोउदोनें
कानांचे नित खजिने भरते....

तूप रोटी खाऊन जा
म्हणतां म्हणतां
मनांत सुजते
सुखासीनतेच्या कांक्षेचा
कच्च्या पायावरचा इमला
कोसळतांना आज आजच्या
तत्वज्ञांचा असा हवाला....

तुपांत पडली माशी
म्हणतां म्हणतां
मनांत दळते
अचेतनाला आज चिरंतन
वरदानाची मिळते छाया
सत्य जाणिवेच्या नरडीला
असत्य धांवे नख लावाया....

चांदोबा गेला उपाशी
म्हणतां म्हणतां
मनांत जळते
हिरोशिमाच्या सौभाग्याला
लुटते आहे दुनिया खाशी
भरभराटही भंवती असतां
आत्मा आहे आज उपाशी...

आंब्रव १८-६-५५

* * *

## तूं...

तूं पोरी घरंदाज
अंगानें आत्म्यानें
मी आहे भारावुन
याच तुझ्या दीप्तीनें

मुंबई ५-१-५६

* * *

## पायगुणी...

पायदळीं गवत जरी
कधिं न करपले
स्पर्शानें पाणी तर
कधिं न आटले,
घरकुल ना कोसळले
चालतां जरी
पति निधना पायगुणी
हीच कां खरी....

रत्नागिरी १४-७-४९

***

## फूल असले तर त्याला द्या...

त्याचा आहे अेकच प्रश्न
पाण्याला, माळांना, झाडांना, खडकांना
जन्म दिला कुणि या दुःखांना
रोज दिवाळी करणारे जग
त्याला देते दगडांचा अहेर....तरी अखेर
त्याचा आहे अेकच प्रश्न; फूल असले तर त्याला द्या....
विणला जातो भुलव्या रात्रीं
स्त्रीपुरुषांचा गोफ जरी
अजुन नाही नव्या पिंडांच्या
मानवतेची चाड उरीं
त्याचा आहे अेकच प्रश्न; फूल असले तर त्याला द्या...

रत्नागिरी ४-८-४९

## मनांत दडल्या लक्ष चांदण्या

मनांत दडल्या लक्ष चांदण्या
मिठी मारुनी काळोखाला
मोहरलेल्या जागृतीमधें
हात तुझा मज पिवळा शिवला.

आंबव २२-१०-५०

***

## शुक्र घेऊनी शाल ढगाची...

शुक्र घेउनी शाल ढगाची
थंडित कुडकुडतांना दिसला
पण धारेच्या नजरेमधला
भाव मोकळा मुकाट सुटला....

तकलुप वातावरणाला अन्
भेदी वाऱ्याची तर शीळ
लहरत सार्थकतेच्या लहरी
जरा मोडक्या हृदयीं पीळ....

ओलावा लोचनीं ओघळे
दिशादिशांना ओळखतांना
आठवणींचें उत्कट दहिंवर
धुवे मनाच्या पानकळ्यांना....

करवीर २३-९-५०

***

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 28808 वि. 3424
क्रमांक 23282 नों. दि. 5/3/85

## जग विसावतां...

जग विसावतां
पडद्यावरचें....

वीजयंत्रापरि
जागतात सत्यात्मे,
रचीत स्वप्न
अश्रूंच्या गर्भांत
गतिमान स्थिरतेचें....

पाहिलेस कां ?
त्याचसाठीं
प्रकाश होतात
त्यांचे डोळे....

करवीर ५-३-५२

***

## चांदणी दुपार...

न चाहुल देतां
झाले गडप डोळ्यांचें भुंगे
हातांच्या पाकळ्यांत,
खळखळले हांसू
तेंच हात आले गळ्यांत
बेहोषीनें गेली मिसळुन
सागर नदी....

कळले शब्दांना त्यांचे अपुरेपण
राहिली गिरकत
झिंगल्या तनमनांत
चांदणी दुपार....

करवीर १४-१२-५३

***

## मावळतीच्या मार्गावरुनी...

मावळतीच्या मार्गावरुनी चंद्र चालला आहे
मंदमुग्धसा पहांटवारा सुटला आहे
क्षितिजामधुनी ओळखिची तर मिठास थंडी भरली आहे
शांतशांतशी आंबराइ पण तिच्यासारखी हांसत आहे
मी घराच्या अंगणामधें उभा राहिलों आहे....

भंवतालाची मादक ठेवण दृष्टी टिपीत आहे
तिच्यांत जीवन मिसळत आहे
शाश्वततेच्या मकरंदाला चाखित आहे
निळ्या पोकळींतील ढगांच्या मागें
यातनांस हें काळिज गाडित आहे
अन् ढगाढगावर
आकांक्षांचें मिनार वरवर चढवित आहे....

पुन्हां यायचा निरोप देत चंद्रहि गेला
दृष्टीचा टप्पा काळवंडला
शिणशिणली हुरहूर जराशी बरगड्यांतल्या चैतन्यांत
तशीच सुकलेल्याही करपेळाच्या गवतांत

जास्वंदीच्या पानांत
तुळशीच्या रोपांत,
मनडोळे भिरभिरणारे अवखळ
मनकानांचा पडदा पातळ
भिडला येउन लहरत दुसऱ्या कोंबड्याचा साद
बुबुळावरती चितारली प्रवृत्तीची याद...

नुकत्या फुटलेल्या पंखांना
अनुभवलेले पंख उबारा देत आहेत
अनुभवलेले दुसरे फडफड करीत आहेत
जात्यावरच्या अमृतओव्या लय साधित आहेत....

नउ महिन्यांची पुरी गरोदर रजनी आतां दिसते आहे
सुवासिनीच्या सौभाग्याची मुकी प्रभा तर विलसत आहे
गोड निरोगी स्वप्न हृदयींचें तिला सारखें झुलवित आहे
दंवबिंदूंचे आनंदाश्रू पापणीवरी जमवित आहे....

असें कांहिसें हें दिसणारे बोध होउनी अबोध आहे
कुडि आत्म्याच्या कणाकणाला तें तर उमजुन नुमजत आहे
या तर असल्या जवळपणानें मी हो तुडुंब भरलो आहे
मी तर तुडुंब भरलो आहे अगदीं तुडुंब भरलो आहे
तुडुंब भरुनी आषाढांतील बावीपरि मी वहात आहे....

करवीर ७-१२-५१

***

## ज़खमा माझ्या मीच पुसाव्या...

झिळमिळणाऱ्या वस्त्रांमधुनी
ओसंडत असतांना यौवन
हात काळजाचें तर माझ्या
सांठवण्याला जाती धांवुन,
परंतु ओंजळ बघुन रिकामी
जखमा माझ्या मीच पुसाव्या
सुनेपणानें तुझ्याच नकळत
तरीतरीही त्या झिरपाव्या....

मुंबअी १४-१२-५४

***

## तुझीच कानीं घुमून चाहुल...

तुझीच कानीं घुमून चाहुल
मनांत माझ्या तूं नर्तावी
मला घराचीं वाट अुमगुनी
मिठींत माझ्या तूंच असावी...

जुन्याच मजला जुन्याच तुजला
आनंदानें नित अुजळावे
तुझ्या नि माझ्या यशस्वितेचें
गीत नेहमीं ओठीं यावे....

सये आपुली हृदयें म्हणजे
नव्या जगाची दळे ठरावी
अुद्यांअुद्यांच्या क्षितिजांतिलही
अपुल्यामधुनी प्रीत जगावी...

आंबव १८-५-५४

***

## मरणांस स्मृतींच्या सुरगांठी...

सामान्यांतिल सामान्याला
धरून उराशीं कुरवाळावे
घांस मुखीं घालुनी हंसवितां
डोळ्यांमधले आंसु पुसावे....

क्षणाकणांच्या वाटेवरला
प्रवास माझा असाच व्हावा
माध्यान्हीला मध्यरात्रिला
मीच दिलासा जरि मज द्यावा....

जरा कुठें या होतां भेटी
तीच शिदोरी आत्म्यासाठीं
अखेरिला मग निरोप घ्यावा
मरणांस स्मृतींच्या सुरगांठी...

देवरुख १६-२-५४

***

## खुळी पक्वता खुळीच घुसळण...

कधीं अचानक मी अनुभवतां
कार्तिकांतली ओली पूनम
क्षणाकणांतुन
मला घुसळते तुझी पक्वता....

कधीं अचानक मी अनुभवतां
नुकती फळलेली रातांबी
नव्याजुन्यांतुन
मला घुसळते तुझी पक्वता....

कधीं अचानक मी अनुभवतां
मृगधारा प्यालेली धरणी
हवे नकोंतुन
मला घुसळते तुझी पक्वता....

कधीं अचानक मी अनुभवतां
धणेसालची भरीव लोंबर
हंसुआसूंतुन
मला घुसळते तुझी पक्वता....

खुळी पक्वता खुळीच घुसळण
खुळेच आपण खुळेच जीवन
खुळ्याच आकांक्षेने मोहुन
खुळीच चिरता होते पावन....

आंबव १-५-५४

***

## जाण माझ्या मना आतां...

जाण माझ्या मना आतां । जिथें पुण्य तिथें पाप
कसा बाधावाच शाप । होता ऐसे...

तनधनाच्या घरांत । सारखाच अहंभाव
कसा पडावा प्रभाव । लीनतेचा....

चिखलाच्या तळ्यांतल्या । जिथें बेडकाची वृत्ती
तिथें नाहीं कधीं प्राप्ती । विकासाची....

सदा शंकेनें पेटून । दुज्यांना उगीच जाच
पाठ दाविंत तिथेंच । समाधान....

गुरुच्याच वचनांत । जिथें अडके विचार
कशी व्हावी धारदार । अुक्तिकृति....

पिचलेल्या अनंताला । जिथें अधिक पिचती
त्यांची तीच पुढें गती । सत्य बोले....

जाण माझ्या मना आतां । तुझ्या अस्तित्वाची खूण
जिथें मायेचें उधाण । तिथेंच ती....

माया म्हणजे न हांव । माया नव्हे क्रूर जाल
माया आहे राग ताल । समत्वाचा...

माया नव्हे मृगजळ । माया न जडाचा गुंता
तुझेंच तें गुणवंता । प्रतिबिंब....

स्थळकाळाच्या संवादीं । माया आहे जीवनाची
माया आहे झपूर्झाची । सभोंवती....

मायाच ही जोपासते । डोळ्यामधें तेजतत्व
प्रवृत्तीचें अखंडत्व । संगें संगें....

मायेमुळें ब्रह्मांडाचें । मोल हृदयाला कळे
अहंब्रह्मास्मिचें तळें । तुडुंबतें....

नको माया झिडकारूं । मूळ इहलोकाचें हें
त्यांत कांहीं भलें नोहे । कधीं काळीं....

तूंच आहे कर्ता कर्म । तूंच येथें क्रियापद
वाक्याचा या घेई नाद । अमरता....

आंबव २२-२-५४

***

## सुख मला खुणावतें...

तुझ्यांतल्या उदात्ताचें
मला नित्य विलोभन
तुझ्यांतल्या अथांगाचें
माझ्याभोंवतीं पेडण....

त्यांत माझ्या अस्तित्वाचें
मोल सये दुणावतें
हातापायांच्या कष्टांत
सुख मला खुणावतें....

मुंबई ३-३-५६

***

## भूल पाडुनी दिले न तूं तर...

भूल पाडुनी दिले न तूं तर
कांहिं कुणाला कांहिं कुणाला
तरिही तेजोवलया त्यांचें
दैवत आहे मम निष्ठेला....

तुझी अहंता जरा ऐकुं दे
तुझेंच आहे तेज पिणारी
असीमतेची कुळी येथली
त्यासाठीं कर तूंच तयारी....

करवीर १२-१०-५०

## अजून...

अजून सुखविति मनास माझ्या
सळसळणारीं पिवळीं शेतें
हस्तसरींच्या नाचामधली
वासाची तर उत्कट गीतें,
वर्षभराच्या सतत श्रमांचें
वसुधा करिते अजून चीज
भरलेल्या त्या दाण्यामध्यें
अमरगतीचें अजून बीज....

आंबव १०-६-५६

* * *

## या वेडाची फेड तूंच कर...

या वेडाची फेड तूंच कर
शपथ तुला यमुनेची राधे
तुझ्यामुळें तर माझें पौरुष
क्षितिजे जिंकुन नुरते साधे....

तुझी सखी ती ताकमेढ पण
तुझ्याच मनचें सांगिल तुजला
पहा विचारुन तिला एकदां
कुठें तुझ्या हृदयाची ज्वाला....

वृंदावनची वाट वांकडी
चढलिस तेव्हां तूं आंसावुन
नकोस विसरूं काळक्षणींही
तुझ्या हृदयिनीला तर फसवुन....

तूं बघतांना हळूंच....उसळत
अनंतही साकारित झाले
नकळत....नकळत....नकळत....नकळत....
ओठांचेही झुलले झेले....

सांठवलेले लुटविलेस तूं
तव देहांतिल दहि दुध लोणी
शरमलीस अन् माती उकरित
मी म्हणतांना...माझ्या राणी....

तूंहि बहरलिस....मीहि बहरलों
अधुऱ्या अपुल्या संगमामधें
या वेडाची फेड तूंच कर
शपथ तुला यमुनेची राधे....

मुंबअी ६-३-५६

1093

***

## देण्यांतच मज मिळतें...

हातांतिल शक्तीचें
अश्रूंना मोल कळे
मणक्यांतिल वीजेचा
पायांना अर्थ मिळे....

त्यांतिल मग तृप्ती ही
माझ्याशीं कुजबुजते
सुखदु:खांच्या पोटीं
देण्यांतच मज मिळतें....

आंबव २५-४-५४

* * *

## मान्सून....

आला आला आला मान्सून
जवूळ उठवित दर्या खवळित,
माड-पोफळींना हिसळुन आलिंगित,
आंब्या फणसांच्या अन् रानाच्या
सुकत चाललेल्या स्वप्नांना
असंख्यतेनें पुन्हां रुजवित,
उन्हांतुनी तर तहानलेल्या कष्टांचे
अश्रूंचें अन् स्वेदाचे इप्सित उभवित....

आला आला आला मान्सून
सड्यासड्यावर मोरांचीं मधुस्वागतगीतें
मुक्त काजव्यांची दीपारत,
तांबडमाती ऋतूमती जशि तिसऱ्या दिवशीं न्हालेली
मदगंधानें उफाडलेली....
भोंवरते आगोट
हंसहंसते हें पोट
जाइल आतां इथेंतिथेंतिल खोट....

आला आला आला मान्सून
पडपवणीच्या रामावजाला फुरसद नाहीं आतां
नांगर भरतां भरतां
दहा जणांशीं दहा गांवच्या कमाल बाता,
डांची, लुमण्या, खडसे, इशाड, जोखड, शिवुला
जन्म देऊनी नवा तयांना त्यांचें करि बारसें
किती कुणाचीं जोतें त्याची मोजदाद लाविते पिसें....

आला आला आला मान्सून
बापू तेल्याच्या घाण्याला....बैलाला....
भोंवळ येइल वाटेल इथे नवख्याला
आषाढांतिल गारठ्यास हा गाळी तेल तिळाचें
तो ताठ उबारा जोतांच्या बैलांना
तसा तिळाच्या पेंडीचा
साज असे हा गांवकुठारी खुरुकाचा,
तीळ घेउनी तेल द्यायचे पंजापासुन तर सौदा
गोविंदाचें नाम घेउनी घाईचाच पुरा बंदा....

आला आला आला मान्सून
वाडेशिवणी तर झाली झाली पुरी
आणि पऱ्ह्याच्या हौरानें दुभंगणाऱ्या गांवाला

सांकव घालुन झाले जोडुन,
काशा कुणबी, आबा खोत
चंद्या न्हावी, राघो म्हार
टपटप थेंबांच्या तालांवर
पेरूं लागले भाताचे गोटे
फिरूं लागलीं शेताशेतांतुन जोते....

आला आला आला मान्सून
विराटतेनें धडक मनाची कोरित
तुझ्या नि माझ्या सर्वांच्या
जीवनभक्तीच्या बीजांवर
थेंब मोतिया उसळुन उधळुन
हिरवळण्या कर्तृत्वाला फोडित अंकुर
धना–श्रमांतिल बुझवित अंतर
चिरसौख्यानें फुलवित युगायुगांचें व्यथितांतर
आबादीच्या पुष्ट पिकांनीं भरित हृदय निरंतर....

आंबव १४–६–५४

* * *

## हनुवटींत तुझिया चंद्र दिसे ओणवा...

तूं चालत असतां लाजत मुरकत हळूं
त्या तुझ्या लकबिची मनांस डंसते जळूं
तूं हिसडा देतां मानेला गोडसा
तव नजरेचा मज भाव लागतो कळूं....

तूं खुदकन हंसतां विलसे ग भादवा
क्षण बोलतांच तूं मोगरिचा ताटवा
प्राचीची दौलत स्वप्निल ओठांतुनीं
हनुवटींत तुझिया चंद्र दिसे ओणवा...

मुंबई १४-१२-५४

***

## सत्ता होइल जेव्हां भगवी...

सत्ता होइल जेव्हां भगवी
मानव्याची फिटतिल पापें
अशुभाचें रुप शुभांत बनतां
जळतिल हृदयें पश्चात्तापें....

सुरांत जेव्हां मिळे तुतारी
षंढ अहंता फुंकुन जाई
ढांसळलेले जुळवित असतां
ध्रुवांत कांहीं टिटवी गाई....

सत्ता होइल जेव्हां भगवी
मानव्याची फिटतिल पापे
भरेल माया चरा चरांतुन
सत्यसुखाची अनंत मापे....

आंबव २३।१०।५०

***

## रक्ताचें जग पिसल्यावेळीं...

तुझ्यासारख्या सुगंधितेला
अचूक ठावें
कसें मनाच्या आंसुसतेला
अथांगवावें
कोण कुठेंही नसल्यावेळीं....

कोण कुठेंही नसल्यावेळीं
मी घुसळावें
डोळ्यांमधल्या मोरपिसांचें
रंग रिझावें
धुंद धुंदली असल्यावेळीं...

धुंदधुंदली असल्यावेळीं
द्यावे ध्यावे
तुझ्यासारख्या सुगंधितेला
अचूक ठावें
रक्ताचें जग पिसल्यावेळीं

मुंबई १५-१०-५५

***

## माझें अेकटेपण...

माझें अेकटेपण
कधीं नाहीं मी तिटकारत; पण अकल्पित
दाढीवर हात पोटावर हात
मामुलीपणांतच
जीवनावर धन करते मात....

पोरा तरी अजस्त्र बनते माझें अेकटेपण
पृथ्वीतर हातांत ऑर्किडिअन
व्यक्तिपावित्र्याचें मधुर संगित;
अेकायला येते अनंतातलीं
महान शाश्वताशा; शरमते धन
कुरवाळतो मी माझें अेकटेपण....

करवीर ९-३-५२

* * *

## घरांत...

घरांत इवल्या
मनवंती, तूं धनवंती;
घरांत शिणल्या
सुखवंती तूं फुलवंती;
घरांत हंसल्या
तनवंती तूं रगवंती;
घरांत विणल्या
गुणवंती तूं चिरवंती...

आंबव ९-६-५४

* * *

## नातें निसर्गाचें...

कळकटल्या कुडीनें गांजलेल्या मनानें
बेहोष होण्याची करावी कोशीस
विरघळुन निसर्गांत; आणि जन्मांत
चार वेदांचें कोसळतात धारण
घोणेल्या धर्माचें कोसळते आढे
राष्ट्रीयतेच्या कोसळतात भिंती
घुबड्या वृत्तीचें कोसळते दार
अुफलुन वर रानमाणुस
रांगडा मंत्र त्यानें घोषुन व्हावे पावन
नातें निसर्गाचें नातें निसर्गाचें; हाच सत्य मोक्ष आहे

आंबव २९-१०-५१

***

## रात्रखुणा...

आगच तव सहजपणा
सहजसाच जाळी मज
जळत जळत जगतांना
हिरवळतो त्यांतच रज....

रज त्यांतच हिरवळतां
हिरवळतो सहजपणा—
तुझा; आणि अनंतती
सहजशाच रात्रखुणा....

आंबव, ६-६-५६

***

## मोर...

तुला-तुम्हांला यांतिल अंतर
ब्रम्हृयाच्या कवटींत संपलें
रक्ताश्रूंचे तळे आटुनी
मीहि बाळसे अमाप धरलें....

माझ्या यात्रेमध्यें तेव्हां
काळोखांतिल गाणीं हंसलीं
अुखळामध्यें बाळ कांडुनी
विश्वामधली माया फसली....

परंतु झाली कांहीं हुल्लड
रक्ताश्रूंचें तळे पाझरे
बिंब स्वत:चें पाहुन त्यांतिल
अधिक नाचले मोर नाचरे....

आंबव ८-१-५२

***

## त्यांत रुईनें हंसून म्हटले...

त्यांत रुईनें हंसून म्हटले
तिसरेपणची मी तर नवरी
संसाराला चिरीत गेले
त्या हंसण्यांतिल दु:ख दुधारी...

आसमंत बोथटला अवचित
शब्द सनइचे तडक तडकले
अजि भोंवळली मधुमुंडावळ
मंगलतेचें स्वप्न उखडले....

अन् तांडवली भुतावळीपरि
हृदय क्षतावुन पिवळी अक्षत
पुरेच भेदरले भव-स्वस्तिक
सत्याचीही नुरतां मुर्वत....

सावधली आसूंच्या वलयीं
रक्तामांसाची दुजि नवरी
म्हणत....रुईच्या बलिदानांवर
संसाराची नकली होरी....

मुंबई, १-१-५६

***

## मळ्यांतुन खळ्यामधें....

गवताची लाण झाली
कवळाचे भारे आले
धुमसली भाजावळ
जरा उरीं विसावले
आगोटचे मस्तलेले
कोसळले ढग खालीं
जोते जोते जुंपूनिया
पेरणी सर्वत्र झाली...

आठदिशीं फोंफावली
जित्रापाची मायावती
लोंबरांची कणसांची
जिणी अतां हांसवती....

मळ्यांतुन खळ्यामधें
श्रमांचे हे दिव्य आले
जरा कुठें डोळ्यामधें
श्रांत अतां शांत झालें....

आंब्रव, ८-११-५१

* * *

## या खुर्चीवर बसती मास्तर

या खुर्चीवर बसती मास्तर
शिकवित आयुष्याचें पाठ
पहिली दुसरी करित चालली
मुलें पाठ ते घोकुन पाठ....

जागुन वाचुन पुढें सातवी
पास होउनी शाळा सुटते
बुद्धिभावना जगण्यासाठीं
जीवनखाईमधें तडकते....

साधू होउन भोंदू होउन
मित्र जिवाचें अतां पारखे
अफाट भवितव्याच्या पाठीं
धांवत स्वाध्याकडे सारखे....

त्याच मुलांचें मृदू चेहरे
आतां होती दृष्टीआड
नवीन वर्षीं नवीन तुकडी
ते मास्तर तर पढवित गाढ....

जाड जाहल्या रेषा भाळीं
आयुष्याचें रिंगण खडतर
अुदास अैश्वर्याचें मालक
या खुर्चीवर बसती मास्तर

करवीर १३-१०-५०

***

## कालगतीला तिथें फसूं दे...

तलावांतल्या शांत जळांवर
कधीं अचानक लहर अुठे
तसें मनाचें होतें माझ्या
नसतांना ही असण्याच्या
तुझ्या कलेनें..........

कांठावरल्या वृक्षलतांच्या
त्याच जळांतिल प्रतिबिंबागत
अखंड माझी आंस
तव डोळ्यांच्या अवतरणांत
आशय माझ्या जीवनवाक्याचा
होता, आहे, तसाच असुं दे
काळगतीला तिथें फसूं दे....

मुंबई १७-१२-५४

***

## पंख मनाला अभिलाषेचे...

पंख मनाला अभिलाषेचे
तुझ्याच अस्तित्वानें फुटले
आणि उफाड्या झेपेंतच तर
क्षितिजाचेंही क्षितीज मिटले....

त्या मिटण्यांतच फुललों उललों
माझी शक्ति मला उमजली
तुझ्याच अस्तित्वानें येथें
सोन्याची द्वारका उजळली....

मुंबअी १६-१२-५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 22608 दि.
क्रमांक 7360 नों. दि.

***

## विराटपर्व...

आकाशाचें आकाश मी
कसें मला कवेंत धरणार
क्षणाच्या तुझ्या जगण्यामध्यें
कशा माझ्या चांदण्या मोजणार....

बीजाचेंही बीज मी
कसें मला पाणी घालणार
क्षणाच्या तुझ्या जगण्यामध्यें
कसा कोठें कोंब उगवणार...

आवाजाचा आवाज मी
कसा मला कंठांत कोंडणार
क्षणाच्या तुझ्या जगण्यामध्यें
कशी अनंत तान सोडणार....

विज्ञानाचें विज्ञान मी
कसा माझा शोध करणार
क्षणाच्या तुझ्या जगण्यामध्यें
कशी माझी शक्ति घेणार...

आत्म्याचाही आत्मा मी
कसें मला कुडींत ठेवणार
क्षणाच्या तुझ्या जगण्यामध्यें
कशी उदात्तता फुलवणार...

मुंबअी १६-१२-'५४

***

## कांहीं...

'कांहीं नाहीं अलंघ्य अदम्य
कांहीं नाहीं अनंत असाध्य
कांहीं नाहीं अभंग अभेद्य
कांहीं नाहीं अवर्ण्य अगम्य....'

पोरा तुला सत्य हवे?
कशासाठीं? कोणासाठीं?
अडत नाहीं सत्याशिवाय
बसतात सुटतात जीवनगांठी....

अकारण सत्याचा धरलास हव्यास
तर तुटेल अपुली मैत्री
क्षणांत कांपील आत्म्याचें आकाश
इथली वीतभर व्यवहारकात्री....

ये ये रामा हा घे चंद्र
पोरा तुझा हंसव हट्ट
करुं दे तुझा चुराचुराडा
अशांततेचा विळखा घट्ट....

'कांहीं आहे अलंघ्य अदम्य
कांहीं आहे अनंत असाध्य
कांहीं आहे अभंग अभेद्य
कांहीं आहे अवर्ण्य अगम्य'...

मुंबई, ४-१-५६

* * *

## डोळ्यांमधल्या धुक्यांत डुंबत...

डोळ्यांमधल्या धुक्यांत डुंबत
तुझ्याच; माझी लहरे संज्ञा
या संज्ञेच्या लहरण्यामधें
अनंत शोधी माझी प्रज्ञा...

संज्ञेला या वेडच असले
प्रज्ञेचीही अशीच रीत
स्वतःच कैफुन, कैफवून जग
दोघींचें या अखंड हीत....

अशा स्वयंभू हितामधें तर
व्यवहाराची शपथ संपते
डोळ्यांमधल्या धुक्यांत डुंबत
तुझ्याच; माझें जीवन वसते....

मुंबई २-३-५६

* * *

# या वाटेला वेड घराचे

या वाटेला वेड घराचें
शांत व्हायला आढ्याखालीं
तांबडमाती जांभा कातळ
यांची लुटण्या प्रवाळलाली....

बेडे ओलांडुन जातांना
तुळस भेटते हिरवी चार
तें हिरवेंपण मंजिऱ्यांतुनी
बहाल करिते पूर्वजसार....

ओटीपडवीची पावठणी
कडेस घेउन रांगोळीला
करी गुदगुल्या आठी प्रहरीं
बहिणीबहिणींच्या मायेला....

माजघरांतिल ऊब आगळी
चैतन्याला फिकी पाडते
भानोशीच्या उभ्या भाकऱ्या
उभ्याच नसतां रंगत भरते....

परसामधली नारळ पोफळ
पाटामधलें पाणी पिउनी
कळमासंगें सायासंगें
आबादीची म्हणती गाणी....

सगळ्यांना या टपली मारुन
साद आइची पिंगा घेते
बाबांच्या आठवणी उलतां
स्वरांत अवचित व्यंजन मिटतें....

स्वरांत अवचित व्यंजन मिटतां
पाश निखळती इथें व्यथेचे
पिरशाभंवतीच्या गोष्टीस्तव
या वाटेला वेड घराचें....

आंब्रव, १७-६-५५

***

## तुम्हीं याल...

तुम्हीं याल
अुद्यांच्या बाळांनों
किरणांच्या पायांनीं
मौलिक जन्माच्या अुदयांतुन
इथल्या मातींवर इथल्या बीजांवर
इथल्या बुंध्यावर इथल्या फांदीवर
इथल्या फुलांवर इथल्या फळांवर
इथल्या पूर्ण इथलेपणांवर
शिंपायला विश्वास कनवाळू डोळयांनीं
घडवायला सहवास हृदयाळू कृत्यांनीं....

आंब्रव, १२-६-५४

***

## मनांत ठसलिस तन ठसकावुन...

मनांत ठसलिस तन ठसकावुन
स्मित वर्षावुन
स्मितांत स्वप्निल भव लहरावुन
दंव शिडकावुन
मस्ती अधिकच मस्तविण्यास्तव....

अशा मस्तिच्या लाघवापुढें
हरते जीवन
दिनरातीचें मीलन त्यांतच
होते पावन
तिथें चालतो तुझाच जयस्तव....

त्याच स्तवाची जहाल वेदी
ओठखुळी नित,
पदर धरी काजळवंतीचा
जीतभुके शित
काजळवंती तुझेच वास्तव........

तुझेंच वास्तव जग अजमावुन
जगते पसवुन
स्वतःहि पसुनी विश्व रसावुन
तन अमरावुन
मनांत ठसशी तूं तर यास्तव....

मुंबई, ३-१-५६

***

## कुणिही यावें प्रेषित व्हावें...

कुणिही यावें प्रेषित व्हावें
चार शिव्यांची सूक्तें म्हणुनी
खुशाल अंधारीं मिरवावें
शिष्येला नित मुलांत विणुनी....

अज्ञान इथें आहे कुणाचें
तेंहि नाहीं प्रेषितांना माहित,
गांडुळासारखें इथलें जीवन
तेंही नाही जगणाऱ्यांना माहित,
लुटूपुटूचें केवळ फुलणें
सुसरीचें रडणें, षंढाचे हंसणें;
पण चालतो याचा उदोउदो
नकली नीतीचे डोळ्यावरती बुरखे घेउन
गंधगोळी कपाळीं चर्चुन,
घाण माखल्या पायांचें
घटाघटा तीर्थ घोटुन,
पटकुरावर आडवें होतांना
हॉटेलांतल्या रेडिओवरचें रामनाम ऐकुन....

कुणिही यावें प्रेषित व्हावें
तळपवीत हातांतिल बंदुक
लालुच दावुन इतरांसाठीं
खोदावे नित संगर-खंदक....

युगायुगांच्या तारेवरची कसरत
चालली आहे अशीच घसरत,
सूर्यचकाकी वापरलेले चेहरे
निर्मित आहेत निर्जिव तेजोवलयें !

चंद्रलकाकी संपवणारे मुखडे
फिरवीत आहेत भोगी वलये !
त्याग शब्दाला नाहींरे कळत
त्याचें स्वतःचें जीवनसार्थक
मातींत मिसळत वेडी वीज सांगते त्याला
जगतो आहेस तूं निरर्थक,
सदैव देणारी श्रेय ज्याचें त्याला
शांती आहे हिरमुसलेली
कांटेरी जिभांनीं वेडी सृष्टी सांगते तिला
जाग वांझोटी तुझ्या डोळ्यांतलीं,
प्रेम लटकतां फांसावरती
राजघाटांतुन येतो हुंद्का
हुंद्क्यावरती हुंद्के येतां
प्रेषिताच्या अहंतेचा उडतो भडका....

कुणिही यावें प्रेषित व्हावे
दिव्य सभांची दंगल उडवुन
रेताडाला सुपीक करण्या
ओघाचें नित पाणी अडवुन....

रेताड कुठला हेरावयाला
आणि स्वप्न ओळखावयाला
चष्मा लावुन जातात झोंपी
भोंदू प्रेषित.......भोंदू प्रेषित....

बोटावरची थुंकी नाचविणें
हें तर यांचें ब्रीद आहे !
मृगजळानें आंघोळ घालणें
हें तर यांचें मांगल्य आहे !

पालवीची प्रामाणिकता माहित नाहीं
अणूचें अमरत्व माहित नाहीं,
उघडे पाडतात यांचे कोड
हंसता हंसता सहा ऋतूही....

प्रेषित नव्हे हा तर आहे वेताळाचा हिजडावतार
पेरित आहे संसाराच्या चौथऱ्यावरती अंगार
गांडुळासारख्या जीवनावरती होणार तरी कधीं प्रहार
अमृत होऊन काळ्या पाण्याचा होणार तरी कधीं संहार....

करवीर, १६-९-५२

***

## तूं वहाते शांत पाणी फक्त आहे मी किनारा...

नकळतांना सखि तुझ्या तर नित्य तुजला मी पुजावे
स्वप्नभेटींच्या विलासीं रासरंगी मी रिझावे;
अधिरले मन सांगण्याला जीवनाचा तूं निवारा
कां परी अंगांत घुमतो अेकअेकच हा इशारा
तूं वहाते शांत पाणी फक्त आहे मी किनारा....

मुंबई, १३-१२-५४

***

## नर-मादी...

राधेच्या हंसण्याचें कारण
कृष्णाच्या ओठांत तरळते
अनंत त्यांतिल भुलवे लाघव
चराचराला न्हाउं घालते...

अभ्यंगाला या असल्या—
कंटाळे कां आज चराचर
प्रश्न एक हा जिवंततेभर....

राधेच्या डोळ्यांतिल आंसू
कृष्णाच्या तर आज न नयनीं
त्यांत न कणही भुलवें लाघव
राधा झाली मादी शयनीं....

मादीपण केवळ दिसतां
राधेला कां चीड न यावी
कृष्णाला कां लाथ न द्यावी...

चराचराचा सत्यताजवा
जोखी आतां सावधानता
अंगाईची देउन जाणिव
शृंगाराला फळतां फळतां....

आंब्रव, ६-४-५४

***

## डोळ्यांच्या दस्तुरींत...

डोळ्यांच्या दस्तुरींत
माझी तुज खूण पटे
आत्म्याच्या पावतींत
प्रीतभुकी रात्र वटे...

रात्र वटे कृष्णाची
अधर निवे राधेचा
चिरमोहन ताल जुळे
रक्ताच्या फुगडीचा....

रक्ताच्या फुगडीचा
मस्तावुन व्यास फुटे
डोळ्यांच्या दस्तुरींत
माझी तुज खूण पटे....

मुंबई, २२-१२-५५

***

## मी पापी...

मी पापी मी पापी
पापांतच मज मुक्ति
मानवे न केव्हांही
पुण्याची अशि सक्ति....

पापांतच पिचणारे
अश्रूंचें आदि अंत
आढ्यतेंत मीच इथें
होऊं कसा पुण्यवंत....

हास्याला फांस इथें
जोंवर देते शक्ति
मी पापी मी पापी
पापांतच मज मुक्ति....

मुंबई, १-१२-५५

***

## तूं न जवळ असतांही.......

तूं न जवळ असतांही
मी हुंगी स्पर्शगंध
चढते मज स्वप्नधुंद.......

तूं न जवळ असतांही
ओठांचा लालबुंद
अनुभवतो मुक्तफंद........

तूं न जवळ असतांही
नजरांचा लक्षवृंद
आवळतो हृदयबंध........

तूं न जवळ असतांही
गुणगुणतो नुरुन अंध
'दोघांचें वलय वंद'........

मुंबई, ३०-१२-५५

* * *

## कोण तूं...

ब्रह्मांडाचें पोट तुझें
किरणांचें केस तुझें
पावसाचे अश्रू तुझें
काळापरी मन तुझें,
असंख्य सूर्यमालांनीं
भरलेले डोळे तुझे,

तुझी उक्ति तुझी कृति
सात समुद्रांची भरती,
लाजे मेघांची गर्जना
तूं हंसतां अन् रडतां....

नकळत परी येसी
माझ्या मनांत राहसी
सांग कोण तूं असती....

आंब्रव, ३-५-५०

***

## छपविलेस तूं जरी मनांतिल...

छपविलेस तूं जरी मनांतिल
तरि डोळ्यांतिल लाज सांगते
लहर लहर जी तनगंधातिल...

त्या लहरींच्या हिंदोळ्यावर
अक्षरेख झुलतांना माझें
जीवित निथळे या विश्वांवर....

या विश्वाच्या विश्वपणाचें
तुझ्याच ओठीं नटते लाघव
मुक्त हंसवुनी भय मरणाचें...

मरण संपते या रक्तांतिल
तुझें तुझेंपण मला घेरते
छपविलेस तूं जरी मनांतिल....

मुंबई, ९-१२-५५

***

## आरवला ना कुठें कोंबडा...

आरवला ना कुठें कोंबडा
हंबरलें ना कुठें वासरूं
फडफडलें ना कुठें पांखरूं
क्षितिजावरती उषा न आली....

मुळांत माझी इच्छा प्राचिन
हिरमुसली ती या घटनेनें
कवटीमधली अधिक पोकळी
रुंदावत तर गेली....गेली

गतकालाच्या वाटेवरुनी
जें जें आलों पाहत पाहत
कुठें न साफल्याची किमया
जर कां दिसली ती तर रोगट....

लंगडधिंगे जेते कोणी
मिरवित असतां घसरून पडले
ज्या विश्वाचा चेंडू केला
त्या विश्वाचा फटका बसला....

शास्त्रामधले शास्त्री कोणी
अुगीच बडवित अपुली टिमकी
सनातनाच्या सचेतनाची
घुमवित होते मिरासदारी....

अनंतामधें दुर्बिण लावुन
बसला होता बोटें मोजित
अपुल्या कर्तृत्वांतच गुंगुन
सुखी कराया भंवतालाला...

रसायनाची किमया लौकिक
पेल्यामध्यें खुषींत ओतित
सांगत होता एक हेंच हें
जगावयाला मरावयाला....

साधुत्वाचा आव आणुनी
महिम्यावाली लंफगेगिरी
अभिमानानें दिवस लोटण्या
प्रात्यक्षिक तें खिसे कापुनी...

अन् आरोळी तत्त्वज्ञांची
दिव्य अलौकिक स्वस्त माल घ्या
परंतु ईझम्च्या स्पर्धेच्या
माशा घोंगवणाऱ्या वरती...

माणुसकीला विसरून बनलों
कपडेवाले पुरे मवाली
क्षितिजावरती उषा न आली
मांसामधली फक्तच लाली...

पुन्हां आणखी पहांट आली
पुन्हां आणखी मी खोलींतच
स्वप्नाच्या तरि पहाटेंतला
आरवला ना कुठें कोंबडा...

करवीर, ११-१२-५१

***

## अेक तुझी चाड मला...

अेक तुझी चाड मला अेक तुझें भान
रक्ताच्या रक्तांतहि अेक तुझा मान....
गंधाला गंध तुझी देण्याची रीत
अनुभवुनी खुळावते ओठांवर शीत....
जिंकताच प्राण तुझा शरिराची पैज
अपुरी मग अपुल्याला विश्वाची शेज....
अेक तुझी चाड मला अेक तुझें भान
जगण्याच्या जगण्यांतहि एक तुझी आण....

मुंबई, २०-१०-५५

***

## इथेंच डोळे हुंगु लागती....

इथेंच डोळे हुंगु लागती
शिरशिरणारे बन कदलीचें
इथेंच डोळे स्पर्शु लागती
थुरथुरणारे विश्व कळ्यांचें,
याच क्षणाच्या गिरकीमध्यें
युद्धांचीही बुझते आठव
केंसरांतले हें ताजेपण
जमीन झिंगत म्हणते सांठव...

आंबव, ६-६-५४

***

## आकाशाला स्वप्न विचारी....

आकाशाला स्वप्न विचारी
पृथ्वी म्हणजे तूंच तूंच-कां
आकाशाचें अेकच अुत्तर
अशी तुला कां येते शंका....

नकळत माझ्यामधें अुसळती
तिची आंसवे तर वाफेंतुन
माझें आंसू तिच्याचसाठीं
तिची सफलता त्यांतुन त्यांतुन....

आंसवांत हास्याचें मिळते
लुटलुटण्याला तर चिरवांछित
अनंत सौख्यच बनतो आम्हीं
स्वामित्वाला पायीं चिरडित....

आंबव, १८-५-५४

***

## सांवळ्या हिरव्या...

सांवळ्या डोंगरांत जावें, सांवळा डोंगर व्हावें
स्वार्थी अीझमचा गर्भपात करून
फसव्या पदव्यांना गटारार्पण करून
अणुतांडवाची शक्ति गारठवुन
नित्य ताजें सांवळेपण ल्यावें प्यावें....

आणि उघड्या अंगानें
अनंतांत मान खुपसुन
नवग्रहांची शर्यत निरखावी,
पडत्या विमानाला आसरा द्यावा
यंत्रावताराचा अपराध पोटांत घालावा....
अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या
सूर्य होऊन तळपणाऱ्या
आईच्या पुण्यपदांना वंदन करणाऱ्या
नररत्नांना आसरा द्यावा.
त्यांच्या खलबतांच्या श्रुतिस्मृति ऐकाव्या,
ऐकत ऐकत
रोहिणीच्या नक्षत्रांत
मान्सून-ढगांना खांद्यावर घ्यावें
शांतीचें आबादीचें स्वप्न रुजवावें
मनमुराद
वाऱ्याहुनही
मनच्या मनांत अंगच्या अंगांत खूपखूप हंसावें...

हिरव्या डोंगरांत जावें, हिरवा डोंगर व्हावें
डांबरीवरल्या चाकांची टरटर विसरुन
पडद्यावरल्या सुक्या अश्रुंना वाफवुन
'काय हो?' 'ठीक आहे' चा गळा दाबुन
नित्य ताजें हिरवेपण ल्यावें प्यावें...
झिळमिळत्या
आहे कीं नाहीं भासविणाऱ्या
रेशमापेक्षां
हिरवळ उत्तम अंगावरची
आभाळाच्या भट्टींतुन आलेली
चंद्राची इस्त्री मारलेली;

रानफुलांचें अमृतगोंदणें
लाघवी नागमोड सारणींची
स्वतःच पाहुन
राहुन राहुन
चंचलतेहुन
मनच्या मनांत अंगच्या अंगात खूष खूष व्हावें....

आंबव, २४-१०-५२

***

## कुकडी कुक...

कुकडी कुक
लपली होतिस
कृत्तिकेच्या कुंजाआड
मी तर द्वाड
हुडकुन हुडकुन तुला घेतलें हुंगुन हुंगुन....

कुकडी कुक
लपली होतिस
विपुल मधाच्या पोळ्याआड
मी तर द्वाड
हुडकुन हुडकुन तुला घेतलें प्राशुन प्राशुन....

कुकडी कुक
लपली होतिस
द्राक्षांच्या घडाआड
मी तर द्वाड
हुडकुन हुडकुन तुला घेतलें खाऊन खाऊन....

8093

कुकडी कुक
लपली होतिस
झिंगुन माझ्याचआड
मी तर द्वाड
हृदयुन हृदयुन तुला घेतलें तेवुन तेवुन....

आंबव, २१-४-५४

***

## आड...

आंतल्या व्यथांनी । पेटते मनाची
अनंत टिंबांची । उभी आड....

सत्यविचारांच्या । त्यांतल्या भेंकऱ्या
तुडविती दऱ्या । पळूनिया....

अंवती भंवती । होउन पिसाट
धांवतो धुकट । अज्ञानाचा....

त्यांत 'मी' 'माणूस' । पुरा घुसमटे
मृगजळ भेटे । विझवाया....

व्यर्थ खटाटोप । आंत नि बाहेर
करावा कहर । माझा मीच....
काळ थोडा जातां । आड ही मनाची
पुन्हां भेकऱ्यांची । राहुटीच....

आंबव, ३०-१०-५०

***

## दुसऱ्यांच्या डोळ्यांनीं...

दुसऱ्यांच्या डोळ्यांनी
प्रीत काय निवडावी ?
तोकड्याच जीवनांत
जीत काय जाळावी ?....

अपुल्या ग डोळ्यांचें
सत्य काय टाळावे ?
मूर्खपणा हा करुनी
आंसु काय ढाळावे ?....

दुसऱ्यांच्या डोळ्यांची
भीड उगिच मानावी ?
तुला मला पटलेली
रीत उगिच तोडावी ?...

मुंबई, १६-१२-५५

***

## मनांत अशि मी तुला उधळली...

अळवावर तूं पाणी उडवुन
अुलुन म्हणालिस
बघ रे बघ थेंबांची जंमत
असले रुसणे तुला तरी कां आहे संमत
....तुझी वंदुनी स्वप्नन्हाळी
मनांत अशि मी तुला उधळली...

प्राजक्ताची डहाळ हलवुन
अुलुन म्हणालिस
केशरवंती बघ रे जंमत
असले मीलन या मातीचें तुला नसे कां संमत
....तुझी वंदुनी स्वप्ननव्हाळी
मनांत अशि मी तुला उधळली...

वाऱ्यावरती पदर पिसावुन
अुलुन म्हणालिस
जोबनगुंगीची बघ जंमत
असले माझे शरिर-उखाणे तुज असती कां संमत
....तुझी वंदुनी स्वप्ननव्हाळी
मनांत अशि मी तुला उधळली....

मुंबई, २०-१२-५५

***

## ओणवतां तूं इंद्रधनूपरि...

ओणवतां तूं इंद्रधनूपरि
माझ्या क्षितिजावर
व्यापकता मग होते पोरी
तनवंतीचे घर;
जगब्रम्हाचे फुटती बुदबुद
कुठेंच पळती पर
चिरतेलाही तुझें नि माझें
अेकत्व करी सर....

देवरूख, ५-८-५५

***

## ते दिवस...

ते दिवस
आतां होते हो आतां होते
अुडुन गेले कवड्यासारखे....

म्हणतात दाजी म्हणतात अप्पा
नव्हेत या तर छकड्या गप्पा
दांत कोरण्यानें दांत कोरीत
अस्वली पोटावर हात फिरवीत
चांदीची शेंडी सडकून झटकीत
सुटलेल्या चामडीवर दृष्टी फिरवीत
‘ हयातींत झालीं दोन युद्धें
अेकापेक्षां अेक शिरजोर
जमिनीवरलें हवेमधलें
माणसापेक्षां बांब थोर,
जन्मायचीं माणसें मरायचीं माणसें
त्यांत नाहीं अेवढें विशेष
अन्न नाहीं धडुत नाहीं
देवापेक्षां लय मजा ब्येस,
सव्वा फद्याचे शेर बटाटे
कुठल्या देशाला गेले आतां
चार भाजा दुगाणीच्या
कुठल्या देशाला गेल्या आतां....’

सातावरती शून्य ठेवलेली
जिजी म्हातारी आली ओटीवर
बोलूं लागली दाजी अप्पांना
हात टेकुन कमरेवर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ..... वि .....
क्रमांक ..... नों. दिनांक .....

‘ रुपाया होता गाडीचें चाक ’
खद्खदुन ताडकन् म्हणाले दाजी
‘ हें काय बोलतेस, हें काय बोलतेस
रुपाया होता वाघाचा डोळा ’
तिचा पुन्हां मोकळा गळा
‘ रुपाया जर कां कनवटीला
दर होत होता दहा पायलीला
रंगुनमधल्या चक्क तांदळाला ’
‘ तर तर ’ म्हणाले अप्पा
‘ नागपूराकडचें धोतराचें पान
त्यानेंही येण्याचा पिळला कान ’
म्हणाले दाजी विसरून भान
‘ रंग पक्का झालाय कच्चा
कच्चाच आतां ठरलाय् पक्का
चाटा स्वराज्य चाटा स्वराज्य
खो खो खो....हा हा हा आँ....’

नव्वदीच्या त्या दाजींची
बोलतां बोलतां ढांस उसळली
जिजीची आणि अप्पांची
पाण्यासाठीं धडपड झाली

आंब्रव, ९-११-’२१

***

## कधीं न मोहरली ती काजू...

कधीं न मोहरली ती काजू
मी न पाहिलें अेकहि बोंड
तिच्याच दु:खानें भारावुन
कातळ करतो आंबट तोंड....

तिच्या नशीबीं फत्तफत्तशी
गच्च गच्च पानांची गर्दी
परंतु उडणाऱ्या पक्षांना
फळभाराची मिळे न वर्दी...

वर्षोवर्षे अबोल आहे
पुढेंहि राहिल अशी करंटी
पिढ्या पिढया तर म्हणती, म्हणतिल
ती वांझोटी....ती वांझोटी....

मुंबई, ३०-११-५५

***

## जा षंढांनो मला न पर्वा...

१

जा षंढांनो मला न पर्वा
म्हणतो चैतन्यात्मा
या मातीवर नव्या पहाटे ताज्या सकाळीं
जगायचें मज मणक्यामधल्या अणूअणूंच्या संयोगानें,
जुनाट इथले बोल पाहुनी
मलाहि झाली स्वप्नधारणा
भव्य मार्ग तर करावयाची
क्षयी आढ्यता नको कुणाची....

२

विवेकांतुनी जन्म घेतल्या
सत्यवंत अन् कर्मशील त्यागाची
पूजा केली पायांतिल जोड्यांनीं
तुम्ही तुम्ही,
रक्त पेटते माझें
माझीच मला मदत जरीही
हीच दशा नच राहिल कांहीं
पिढ्या उद्यांच्या त्यांच्यासाठीं....

३

कशास तुम्ही बलिदानांचा ढीग रचला
अुत्कर्षाला कुंपण घालुन देव निर्मिला
कां न तुम्हांला ईश्वर दिसला तुमच्यामध्यें
भक्तिशक्तिला बुळी बनविली विसर्जुनी त्या गोट्यामध्यें
माणुसकीचा विटाळ धरला
कसें मिळावें स्वास्थ्य तुम्हांला
अश्रूंचाही डोह आटला....

४

जिवंत इथली भुताटकी
सूर्यापुढल्या फसवेगिरिची
साम्राज्याच्या सीमेसाठीं
नाण्यामधल्या शाहीसाठीं,
जरी उपाशी रडते दुनिया
राबुन कष्टुन जगणाऱ्यांची
भिक्षेची तर हातीं करटी
करटीलाही त्या लुच्च्यांनीं

तीन भोकें दिली पाडुनी
अन्न वस्त्र घर नित्य शोषुनी,
अुद्दो अुद्दो तरि परवचणाऱ्या
जा धंद्यांनो मला न पर्वा....

५

शहरामधलीं उंच धुरांडी
भवतालाला काळवंडणारी
छपराखालीं जाळित असती
आयुष्यांतिल शांतीचे सोनेरी धागे
माझ्या तुमच्या चराचराच्या
आणि ठिगलुन तशीच जगते केवळ मरण्यासाठीं
वठलेली जनता,
पोटचा गोळा करि आईला जुलुमी वंदन;
छाया या तर सांगाड्यांच्या
प्रवासी प्रवासिनी
यांच्यासाठीं भव्य परीषद
शब्दच्छल, शांतीवर आपद
अहवालांचा एकच नाद
कुठली शांती कुठला मानव
रहात नाहीं कुणास आठव
तिथेंच कोठें आसपासशी
प्रतिभा करते खर्डेघाशी
वाल्मिकी करतो इथें हमाली
मुर्दाड तिजोऱ्या नाचविण्याची
निर्ढावुन हे बघणाऱ्या
जा धंद्यांनो मला न पर्वा....

६

समुद्रांत जर पाणी नाहीं समुद्र त्याला म्हणूं कसें
शांतविकासी जीवन नाहीं जीवन त्याला म्हणूं कसें
अनुभूतीं जर शाळा आहे प्रामाणिकता सोडुं कशी
पडत असतां चिकटवूं किती नाटकांतली नकली मिशी
परमाणुचें ब्रह्म कळुनही सत्यसुखाची प्राप्ती न होते
एका क्षणांत असंख्य मारुन विमानांतुनी क्रुरता हंसते
अजून कांहीं मेला नाहीं श्रीमंतीचा अेलेफंटा
भास जिथें तो मेलेल्याचा, माणुस तिथें कां करंटा....

७

माझ्यासाठीं जगणें आहे
निसर्ग इथला आस्वादुन
सौंदर्य मुक्त करणे आहे
अजाण स्पर्धा दुभंगून,
अगणित खजिना देणें आहे
कारुण्याला आनंदाचा
सूक्ष्म दीर्घ तर हेरणे आहे
अनंत भाग भवितव्याचा,
आभाळधनू उगवणें आहे
विविधतेतुन सुसंगतता
खऱ्या परंपरेतुन फुलवणें आहे
व्यक्तित्वाची सरंगतता,
जा धंद्यांनीं मला न पर्वा
मिळवणार मी दिव्य दिव्यता
हाच मंत्र हेंच तंत्र
मीच माझा भाग्यविधाता....

करवीर, ८-३-५२

***

## आषाढांतिल...

आषाढांतिल
अवखळ रात्रीं
अवखळतेनें देह जुळावे,
हिरवळलेल्या
काळोखांतच
अवखळतेनें जरा लपावें....

तिथेंच घोंटाळत असलेला
अवखळलेला
एक काजवा,
उफाडलेल्या हृदयीं त्याचा
जरा टिपावा
अवखळ कावा....

आंजव, १९-६-५५

***

## त्र होउनी शपथ घाल ये...

त्र होउनी शपथ घाल ये
क्षणाकणांतुन तूं झेंपावुन
माझ्या रक्ताच्या ईर्षेला
नित चेतव ये तूं नादावुन....

रक्ताची ईर्षा चेतवतां
फिटेल विश्वाची या किंमत
विरेल पापाचा बकवाही
संगमांतलें वंदुन दैवत....

संगमांतलें वंदुन दैवत
राहिल जीवन अमृत होउन
रात्र होउनी शपथ घाल ये
क्षणाकणांतुन तूं झेंपावुन...

मुंबई, ४-११-५५

* * *

## बाब्या चाकरमानी...

बाब्याकडुनी कागद आला
'येत्या येकादशीस निघतो'
अैकुन पोरेंटोरें फुलली
घरिणीच्या इच्छा मोहरल्या
आईची आंसवें हांसलीं
तात्यांच्या सुरकुत्या लोपल्या....

बाब्या चाकरमानी आला
दुसऱ्या चाकरमान्यांचे तर
त्याजबरोबर होते कागद
कुणाकुणाचे होते पैसे
निरोप होते, होत्या भेटा
'कायरे बाब्या कदवां आला!'

'माजी गंगी हायना ब्येस ?'
'बावा माजा तुला नाय भ्येटला ?'
'येवडंच म्हनाला आयेला द्येस ?'
नवी कचकडी अटुकमिटुकची
पेटाऱ्यांतुन काढि खेळणीं
गिधडागत पोरांच्या झेंपा,
नानकटाई आणि मिठाई
हिरवे पिवळे डबे तांबडे
कांहीं सोडुन देई वाटुन
बदाम पिस्ते वर लुकलुकती....

आओसाठीं तात्यासाठीं
जुन्या ठशाचीं नवीन धडुतें
खास सुपारी मुंबईपानें,
माघारणीस लुगडें चोळी
तिच्या आवडीच्या वाणाची
घरधनिणीचा भाव भाबडा
अरामधुन अन् डोळयांमधुनी
कढूं लागला....कढूं लागला....

म्हाकुळ म्हाताऱ्यांना सांगी
राजकारणी गंभिर गप्पा
गिरणीमधल्या संपाच्या अन्
टिन्पाटापरि कांहिं भाषणें
लोकलमधली मुंगीगर्दी;
जवान जमती त्याच्याभवतीं
मनेल रंगुन त्यांना सांगी
इंपिरिअलतिल पिक्चर मस्त,
इलेक्ट्रिकीच्या करामतीच्या

गोष्टी त्यांतच ठसकेदार
चौपाटीची खारी भेळ
म्हणे खावया भपकेदार,
विचारतां कुणि मुक्काम किती
दाराआडिल माघारणिची
पिऊन दृष्टी आंसुसलेली
धोत्यासारी फिरवी जिभली
'अव म्हयन्याची रजा घ्येतली....'

करवीर २३-८-५०

***

## सुती इच्छा लोकरी माया...

सुती इच्छा लोकरी माया
टीचभर आयुष्याला
देतात उबारा.

जमाखर्च
सांगडतां सांगडतां
हळवा प्राण
आशेखोरपणें
उगीच पाजळतो
अल्लादिनचा
दिवा जादूचा.
प्रामाणिकता
आणि शुचिता,

निस्वार्थीपणा
आणि प्रेम,
व्यक्तीमधून
समाज रुजवून,
चार चाकांचा हा मनोरथ
धांवतो बेफाम घेत वळणें
धर्म अर्थ
काम मोक्ष.

अखेर अमर
निदान वंशांत
साडेतीन हातांची
निसर्गकिमया........

आंबव, ९-११-५१

***

## चंद्राच्या वृंदावनीं....

चंद्राच्या वृंदावनीं
प्रीतीची मी तुळस लाविली
आठवणींचे पाणी घालुन
हिरवी वाऱ्यावरी पाहिली...

आतां त्या तुळशीला
फुटल्या सोनेरी मंजीऱ्या
सांज-सकाळीं असतो जमवित
क्षितिजाच्या परडींतच साऱ्या...

आंतिल तर काळें बीं
घुसळुन मजला अुधान उठवी
इथें तिथें तर तूंच दाखवुन
स्वप्न फेंकुनी डोळे मिटवी....

करवीर, १४-१२-५०

***

## अशि गंधाची अशि संगाची...

रूप मखमली
डोळ्यांच्या मानसांतलीं
भावुकतेची
डुंबडुंबणारी मदहंसी....

अशि रंगाची अशि ढंगाची
मावळतीची माया पिअुनी
लाल तांबड्या पेशीमधुनी
लवलवणारी
ओठांमधली निसर्गवृत्ती फुलवुन
डोळ्यांच्या देठांतुन
हृदयवेदना कळवुन
अशि गंधाची अशि संगाची....

करवीर ७-९-५१

***

## पोरा मी तर काजळभोळा....

पोरा येते काजळगुंगी
माझ्या रक्ताच्या दरियाला
स्वप्नमुखीच्या चाहुलिनेही....
तिच्याच धुंदित दुणावलेला
पोरा मी तर काजळभोळा....

आंबव, १६-६-५५

***

## रूळ बदलते जेव्हां गाडी...

रूळ बदलते जेव्हां गाडी
युगायुगांचें तुटतें अंतर
अनंतांतल्या अनंतासही
थप्पड मारी जंतरमंतर....

जंतरमंतर हें मेंदूचें
काळोखाला हुसकुन लावी
युरेनियमच्या आत्म्यानेंही
यांतच अपुली लय साधावी....

त्याच लयीचें वेड मनाचें
इथें सुखाची भरते कावड
रूळ बदलते जेव्हां गाडी
जगण्याची मज खमंग आवड....

आंबव, १६-६-५५

***

## मला बोलवतात....

अनंत हेरणाऱ्या नारळी पोफळी
काजूंची बोंडे लाल पिवळी,
मिठ्या आंब्याची रसाळ लटुंगी
पिरॅमिडपरी जाळीदार रातांबी,
बरके कांपे अंगाचें फणस
भरास आलेले नाचणीचें कणस,
कातळवट सडे धीरगंभीर
वरीचें केंसर भाताची लोंबर,
हिरवे बदामी तांबडे तुकडे
रेताडाचें अुतरंडीचें
चौरस काटकोन ना सपाटीचें
झुळझुळते पाणी उपाद्या पऱ्ह्याचें,
करंद चिवारी कुंभ्याची फुले
तांबडमातीचें हृदय उले,
तिथला हिंवाळा तिथला उन्हाळा
तिथला वारा तिथला पावसाळा,
साऱ्यांचें प्रेमळ साद अेकवटतात
मला बोलवतात मला बोलवतात....

करवीर, ६-३-५२

* * *

## मी माझ्याशीं हंसतो तेव्हां...

मी माझ्याशीं हंसतो तेव्हां
दुनियादारी होतें अंधुक
निष्पापांचे जिव घेणारी
हातीं नसते पापी बंदुक...

मधाळती मग कडवट गप्पा
नरक पाहती रुपये आणे
शत इच्छांची थांबुन किरकिर
स्वप्न आवरी देणें घेणें....

आंबव, २४-१०-५२

***

## नको पाहूं पोरी अशी....

नको पाहूं पोरी अशी
खोल डोहांत डोहांत
डोह आहेत याहुनी
तुझ्या मनांत मनांत....

नको पाहूं पोरी अशी
खोल पाळांत पाळांत
पाळे आहेत याहुनी
तुझ्या देहांत देहांत....

मुंबई, १८-११-५५

***

## भाळूं नको तर काय....

तेरड्याच्या फुलाहुनी
गोड सये तुझी सय
भाळूं नको तर काय....

पऱ्ह्याच्याही नादाहुनी
गोड सये तुझी लय
भाळूं नको तर काय....

करंदीच्या कोंबाहुनी
गोड सये तुझे वय
भाळूं नको तर काय...

पोफळीच्या बागेहुनी
गोड तुझा अनुनय
भाळूं नको तर काय....

मृगांतल्या मातींहुनी
गोड सये तुझा जय
भाळूं नको तर काय....

आंबव, १७-६-५५

* * *

## या स्वातीला शिंप न मिळते....

या स्वातीला शिंप न मिळते
मोती मौलिक बनवायाला
इच्छेमधली वेळ न मिळते
थेंब टपोरी गाळायाला....

समुद्र सगळे आटुन गेले
हैड्रोजनच्या नवकिमयेनें
नऊ दिशांतुन जमीन केवळ
वारा वाहे त्याच दयेनें....

इजिप्त मोहिंजोदरो जिथें
भूगर्भांतुन वरती आल्या
गती विमानी ज्या जगण्याची
त्याच्या कोठें खुणा न उरल्या...

माना मोडुन सिमेंटकॉंक्रिट
सांगाड्यांची पुरी खिरापत
आश्चर्यांचे क्रमांक थिजले
आत्म्यावर वस्तूची आपत...

सौंदर्याच्या आसक्तीवर
हल्ला झाला या मरणाचा
शतधर्मांचे बुरुज उखडले
पथ ना सरला भूगोलाचा....

निसर्ग हंसला हंसली माया
देवत्वाची कृती मामुली,
नव्या जुळविल्या युगसांध्यावर
क्रूर राक्षसी किमया बसली...

ईथरमधुनी कुणी महात्मे
पुटपुटले ते स्वतः स्वतःशीं
या स्वातीला शिंप न मिळते
कल्पें सरलीं तरी उपाशी...

आंबव, ४-११-५१

* * *

## ध्रुवासारखी....

खांद्याला हा खांदा भिडतां
सत्ता क्षितिजामधें भरडली
बाळ लाडके खूप हंसविण्या
संधी कुठली नाहि दवडली....

जीवनतेला गती द्यावया
यंत्रामधली वाफ जाहलों
श्रमदेवाच्या विसाव्यास मी
मातीवरती छप्पर झालों....

सुस्काऱ्यांची जाणिव घेउन
नवे वेद मी लिहुन पचविले
मी नच उरलों माझ्यासाठीं
दहा दिशांना देहिं ठेविलें....

दहा दिशांना देहिं ठेवितां....
सामान्याशीं हंसतां रडतां....

हिमालयाचा गहिंवर हंसला
अमवास्याहि झाली गोरी
मुक्त होउनी अणुरेणूतुन
कुठली उरली ना बळजोरी....

सुखशांतीचें अमृत घेतां
मिटल्या योनी चौऱ्याऐंशी
अनंतामधें रूळ भेटले
बंद न आतां कुठल्या वेशीं....

तरी मनाला कांहिं टोंचतें....
परी शोधतां कांहिं न कळते....

हीच एवढी अंतिम आशा
तेजामधलें तेज होऊं दे
प्राणामधली नित्य दिव्यता
ध्रुवासारखी अढळ राहुं दे....

करवीर, ७-९-५२

* * *

## लयींत माझ्या मीच घुमावे...

लयींत माझ्या मीच घुमावे
गुलबाशीला कवळुन चुंबुन
भुइचांफ्याचें स्वप्न बनावे
सांद्र सुरंगी मनांत मदवुन;
रानबावरीच्याच गुदगुल्या
ल्याव्या मी अन् दवना भावुन
लयींत माझ्या मीच घुमावे
हरणवेलिला जिण्यांत रुजवुन;
केळबनाला विण्यांत हंसवुन
दवांत अवखळ भुलुन भिजावे
कापुरभेंडीच्या पाळांची
खोड काढण्या जरा धजावे;
कोरांटीचें रंग पिसावे
जास्वंदीला सलज्ज बुजवुन
लयींत माझ्या मीच घुमावे
लयींत माझ्या मलाच हिसळुन....

आंजव, १२-५-५३

* * *

## दीठ दुमडतां गरती जांभुळ...

दीठ दुमडतां गरती जांभुळ
आंबा लावी भोगसमाधी
बघुन झऱ्याचें पिसावते तन
झुळूक गिरकत येण्याआधीं;
रानदिशांतिल रंगपांखरे
जाणतात हें कुणि न सांगतां
पण म्हातारा झालेला वड
आठवतो जुनि स्वप्नढंगता....

आंबव, १४-६-५७

★★★

## उभी जिथें तूं फुलते जाअी...

अुभी जिथें तूं फुलते जाअी
माझ्यामध्यें मुळ्याच रुजवुन
....अुत्तररात्रीं कळतें लाघव
मुक्तिमधलें द्वैत संपवुन....
अुभी जिथें तूं फुलते जाअी
माझ्यामध्यें अुलवुन दरवळ
....अुत्तररात्रीं झुरते आठव
ओठांमधलें हरवुन मोहळ...

मुंबई, ३०-१०-५६

★★★

## पत्र...

वाचलेस कां माझें पत्र : ऋतुप्यात्या रुईफुलावरचें
लिहितांना मनांत नर्तन चांदण्याच्या भैरवीचें
बरसत होते; आणि कोटी कोटी वेध तुझ्या बहराचें
मदवित होते विश्व माझ्या रसरंगाचें....

वाचलेस कां माझें पत्र : दंवझेल्या दुर्वांकुरावरचें
लिहितांना मनांत वर्तन गंधांतल्या जगावेगळ्याचें
ओरयत होते; आणि अब्ज अब्ज फंद तुझ्या वास्तवाचें
दंगवित होते वैभव माझ्या विजयाचें....

वाचलेस कां माझें पत्र : किती लाजतेस ग लाडके
भरतीचें मुकेच बोल अडखळलेले .... घुटमळलेले
लाटांच्या पर्वतांतुन हरपलेले .... गवसलेले
माझें वाटटप्पे अुत्तराविना कैफलेले...

आंब्रव, १०-६-५७

***

## माड...

माड आहे माझ्या हृदयांत
पसरलेल्या
ज्याच्या झांवळा दहा दिशांत
जो मनुष्य
त्याचें घर शाकारण्यासाठीं;
त्याच्या घराचा कचरा काढायला

लांब लांब हीर
माझ्या अस्मितेला, सृजनत्वाला, जगण्याची प्रेरणा देउन
तेच हीर देतात धीर...
त्याचें जेवण दुपारचें रात्रींचें
आहे तेंच पक्व करायला
फुलतो अग्नी त्यांतुन;
आणि जेवणाला रुची आणणाऱ्या
जीवनसत्व देणाऱ्या
भाजीला आमटीला
गोड खोबरें....
नाहीं राहिली 'देवाची करणी नारळांत पाणी'
त्यांत पाणी
माणुसकीच्या असीम निष्ठेचें...

माड आहे माझ्या हृदयांत
मुग्धे अशी बघतेस काय
माझ्या जवळ दूर कुठेंहि असतांना
सये स्मृतींच्या कोषांत
अचूक दिसते
त्याच त्याच
तुझ्या डोळ्यांत माडाची सांवली...

करवीर ५-८-५२

***

## व्यर्थ वाटते जेव्हां कांहीं....

व्यर्थ वाटते जेव्हां कांहीं
मनांत मनच्या येतो गहिंवर
थिजते आशा थिजते रक्तहि
सगळे सगळे बनते वरवर;
बरा वाटतो काळोखाचा
सुनासुनासा अफाट प्रांत
साथ द्यावया मनचा गहिंवर
अुरलीसुरली थिजते भ्रांत....

मुंबई, १३-१२-५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

## लज्जत...

नकारांतल्या होकाराची
मनांत बेहोषी उफळावी
चुडा रेशमी पिचण्यामधली
लज्जत रक्तालाच कळावी....
शांतशांतशी दीठ जुळावी
साद घालितां नवीन प्राची
अनंतगंधा वृत्ती व्हावी
नकारांतल्या होकाराची....

आंबव, ५-१०-५१

* * *

# नाना सरावदी...

नवरात्रांतुन हिरवळलेल्या
ताना, थापा आरतिच्या
परशुरामच्या तुळजापुरच्या
करुण कहाण्या जवळदूरच्या
नानाच्या तोंडच्या;
त्याचा पंचा भटकुन भटकुन तांबडलेला,
साधारणसे अंग भोपळी,
शिंदेशाही माथीं पगडी,
नित्य विड्यानें ओठ भासती जांभ्या दगडी,
डाव्या खांदी जुनें उपरणें
उजव्या हातीं असें तुणतुणें....

पुन्हां दिवाळी झाल्यानंतर
येतो पाठवणीच्या वसुलीसाठीं
नानासंगे दोन सोबती
समेलवाला टाळकरी तर जी जी यू जी जी
'गळां सोन्याची झळके कंठी
ओटी भरा या भोवानीची
माझी आली वो अंबाबाई....

मला नांवाची तुझ्या ग गोडी
नांव घेइन घडो ग घडी
घरा रायांच्या दौलत धाडी
बाये वरसाची माझी ग फेरी
माझी आली वो अंबाबाई....

पायली भाताची पाठवणी
पूजा करा या भोवानीची
माझ्या संभाळ अंबाबाई....

बरं कर बाये
रायांच्या घरीं सोन्याचा धूर काढ
इड्यापिड्याला पुरेपूर गाड
गुराढोरांत लेकरामाणसांत रानोमाळांत परदेशांत
जीव हाय जिवाणू हाय माती हाय मसणं हाय
संभाळ माझे आई
रायांच्या घरी दौलत वाढीव
येईल विघ्नांचा चक्काचूर कर
बरकतीचा पूर भर....'
कुणी सांगतां 'नाना म्हण रे जरा पवाडा'
हा ना करतां हळूंच म्हणतो, 'कुठचा गाऊं?
बघ रायांना म्हणून दाऊं'
डोळ्यांपुढती मराठशाही
पुरी जागती पुरी तेवती
तडपक तुणतुण किणकिण जी जी य् जी जी य् जी
'बाळ शिवाजी जिजाबाइचा शूर मनीं दिलदार
छत्रपती हो नांव जगामधिं गर्जत रहाणार....'
अन् पडशीनें पाठवणी सांठवल्यावर
'संभाळ माझ्ये आयशी अंबाबाई
बरांय्....खोतानूं....

आंबव, ४-११-४९

***

## फुटतिल तेव्हां फुट्टु दे डोळे...

फुटतिल तेव्हां फुट्टु दे डोळे
तेज तुझें मी जोखिन तोंवर
म्हणतो जोषुन माझा आशय
चैत्रामध्यें फुलते शेवर....

गतीच माझी बनते शेवर
आणिक पडते अनंतछाया
तेज धांवते नमून मुजरुन
त्या छायेंतच पुरें भिनाया....

कृतज्ञ आहे तरिही आशय
लाल फुलेली आहे शेवर
फुटतिल तेव्हां फुट्टु दे डोळे
तेज तुझें मी जोखिन तोंवर...

आंब्रव २९-६-५७

***

## तुझ्या नजरेंत भिनल्यावर....

तुझ्या नजरेंत भिनल्यावर
संपूर्ण मी
पर्वतांची गूढगंभीरता
मीच बनतो
गूढगंभीरतेंतच सुखावतो....

तुझ्या नजरेंत भिनल्यावर
संपूर्ण मी
केंसरांचा सांद्र ताजेपणा
मीच बनतो
सांद्र ताजेपणांतच विसावतो....

तुझ्या नजरेंत भिनल्यावर
संपूर्ण मी
पंखांची मुक्तभरारी
मीच बनतो
मुक्तभरारींतच दुणावतो....

मराठा ग्रंथ संग्रहालय मुंबई, ४-११-५५ ठाणे स्थळप्रत.
अनुक्रम 22107 वि: ...
क्रमांक 93402 नों: दि: 5/7/56

## पिवळी संध्या....

पिवळी संध्या
गाते विरहगीत
‘ मनाच्या स्वप्नांवर
जगणें आतां....’

पिवळी संध्या
चांदण्यांचें अश्रु ढाळुन
रात्रीचा केशकलाप
रंगल्या मुखावर
घेते ओढुन....

आंबव, २९-१०-५१

***

## उगीच कांहींतरी आठवतें...

अुगीच कांहींतरी आठवते
प्रवाह लहरींचा गोठवते
निळाअीच्या कातरलयींत कातळावर विसावतांना
मेघमल्हाराला पेटवते....

अुगीच कांहींतरी आठवते
भरारी नादाची खुंटवते
भलाअीच्या खमंग खुषींत कातळावर खुमारतांना
मालकंसाला नागवते....

आंब्रव, ११-६-५७

***

## दिशादिशांच्या गर्दींत...

काळोखाच्या मनामधें कुणी तारा खोदी लेणें
काळोख म्हणतो : ताऱ्याचें मी देतसे देणें....
हेंच माझें श्रेय आणि हीच माझी अस्मिताही
अशा तृप्तीला जिंकितां हाय खाअी वंचनाही....
किरणाचें मीच मूळ, त्याच्या जिण्याची न हांव
गूढ आहे गुपीत हें....माझ्यामुळें त्याची धांव...
कळो कोणा वा नकळो देअीन मी माझें देणें
दिशादिशांच्या गर्दींत मोल माझें मीच जाणें....

आंब्रव, १०-६-'५७

***

## जरा दुरूनच...

अनंत असल्या मोहरवाटा
अनंत असली पंखभलाअी
अस्तित्वाच्या अंदाजाला
कळे न इतुकी कशी नवाअी;

भिजून दंवल्या दरींत लहरुन
झुरते काळिज सुके अुरूनच
अशी निसर्गाचीच भुलावण
म्हणून म्हणतो....जरा दुरूनच....

आंबव, ९-६-५६

***

## सह्याद्रिवर मेघ उतरले...

सह्याद्रीवर मेघ उतरले
ब्रह्मांडांतिल बलक घेउनी
संसाराचें बीज रुजविण्या
उक्तिकृतींतिल द्वैत छेदुनी....

कासाविस झालेलें काळिज
स्वतः स्वतःशीं हळूंच हंसले
अन् रक्ताची सांथ घेउनी
पुढेंच घुसण्या मणके जुळले...

गडगडण्यांतुन जाणिव आली
ओठांवरती सूक्तें कांहीं
वीज नव्यानें उजळुन जातां
सेवक नाहीं मालक नाहीं...

घडावयाचें यांतुन कांहीं
ज्याची किंमत ताजी भाकर
पोटापुरती...नको आणखी,
अन्यायाला देउन ठोंकर....

अन्यायाला ठोंकर देतां
पुन्हां गावया भाकरगाणीं
अबोल अंकुरांत बोलकी
मातीची पण अमृतवाणी....

मातीची पण अमृतवाणी
धि:कारी ही जल्लोषानें
ऐदी ऐश्वर्याची नाणी
तिची प्रेरणा वारा जाणें....

तिची प्रेरणा विशाल माझी
तिचें लेकरूं अजिंक्य आहे
सह्याद्रिवर मेघ उतरले
पहिला हा तर शकून आहे....

आंबव, ५-६-५२


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 22.L0.X..... विः ...काव्य
क्रमांक ...2382...... नों: दि: ...61/46
REFBK-0008713
REFBK-0008713